**प्रेसनोट** दि. ३०/०६/२०२३

पुणे महानगरपालिकेतील बिगा-यावर लाच मागणी व लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | शिवाजीनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ६१ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | प्रवीण दत्तात्रय पासलकर, वय ५० वर्ष, बिगारी (वर्ग-४), पुणे महानगरपालिका, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,००,०००/- (एक लाख रुपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १,००,०००/- रुपये |
| पडताळणी दिनांक | २७/०६/२०२३ |
| सापळा दिनांक | ३०/०६/२०२३ |

ठिकाण :- पुणे महानगरपालिकेच्या आवारात.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे आरोग्य विभाग, पुणे मनपा येथून मुकादम म्हणून सन २०२२ मध्ये सेवानिवृत्त झाले असून, त्यांच्या शिल्लक अर्जित रजेच्या रोखीकरणाचा बिलाचा चेक देणेसाठी पुणे महानगरपालिकेतील लोकसेवक प्रविण पासलकर यानी रक्कम रुपये १,००,०००/- (एक लाख रुपये) लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, लोकसेवक प्रविण पासलकर यानी चेक देणेसाठी तक्रारदाराकडे १,००,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, लाच रक्कम पुणे महानगरपालिकेच्या आवारात पंचासमक्ष स्विकारल्यावर लोकसेवक प्रविण पासलकर याना रंगेहाथ पकडण्यात घेण्यात आले असून, शिवाजीनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची कार्यवाही सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक श्रीराम शिंदे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.